**पोलीस अधिक्षक औरंगाबाद ग्रामीण**

| पोलीस अधिक्षक,कार्यालय | **प्रेस नोट** | दिनांक २०.०१.२०१७<br>०२.०० |
|---|---|---|

**प्रति,**

**मा.संपादक**

**दैनिक ..........**

**विषय :—औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दाखल /उघडकीस गुन्हयांबाबत.**

यावदारे आपणास सुचिम करण्यात येते की, औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दिनांक १९.०१.२०१७ रोजी खालील प्रमाणे गुन्हे दाखल /उघडकीस आले आहेत.

**०१) पोस्टे पिशोरः—** गुरन I १३/१७ कलम ३७९ भादवि नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे संतोष बहेनाजी थोटे वय ४२ व्यवसाय नौकरी ग्रामसेवक ग्रामपंचायत नादरपुर ता. कन्नड यांनी फिर्याद दिली की दिनांक १४.०१.२०१७ रोजी १२.००वा. ते दिनांक १५.०१.२०१७ चे ०६.००वा. दरम्यान यातील अज्ञात आरोपीने ग्रामपंचायत नादरपुर येथील सौर उर्जेचे दोन संच किं. १८,०००/—रू. लबाडीचे इरादयाने चोरून नेले म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोना/६४१ पाटील पोस्टे पिशोर हे करीत आहे.

**०२) पोस्टे बिडकीनः—** गुरन I १८/१७ कलम ४३६, ४५२, ३२३, ५०४, ५०६ भादवि नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे नितीन श्रीमंत सरोदे वय २५ व्यवसाय किराणादुकान रा. केसापुरी ता. पैठण यांनी फिर्याद दिली की यातील फिर्यादी व त्याचा भाउ नेहमी प्रमाणे किराणा दुकानाचा व्यवहार करीत असताना यातील आरोपी नामे गणेश भाउसाहेब आवारे रा. केसापुरी ता. पैठण त्यांचे किराणा दुकानात घुसुन त्यांना शिविगाळ करून धमक्या देवुन चापटाने मारहाण करून दुकानाचे सामानाची फेकझोक करून दुकानातील आग पेटीतील आगकाडीने आग लावली आगी मध्ये दुकानातील किराणासामान नगदी पैसे टीव्ही, फ्रिज व ईतर सामान तसेच दिड क्वींटल कापुस जळुन नुकसान केले आहे म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास श्री.जोगदंड सपोनि पोस्टे बिडकीन हे करीत आहे.

**०३) पोस्टे फर्दापुरः—** गुरन । ०४/१७ कलम ४९८(अ), ३०७, ५०४, ५०६, ३२३, ३४ भादवि नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे सौ. हिना अलताफ शहा वय २० व्यवसाय घरकाम रा. जाटगाव चौफुली तेली डॉ. यांचे घरासमोर पाचोरा जि. जळगाव ह.मु. फर्दापुर यांनी फिर्याद दिली की यातील आरोपी नामे १) अलताफ शहा रशिद शहा (नवरा) २) रउफशहा रशिदशहा (जेठ) ३) हमिदशहा रशिदशहा (जेठ) ४) नौशादबी रशिदशहा (सासु) ५) रशिदशहा कासम शहा(सासरा) ६)शाहीनबी हमिदशहा(जेठानी) ७) अफसानाबी रउफशहा (जेठानी) ८) जरीनाबी मस्तानशहा (नंदेची मुलगी) सर्व रा. पाचोरा जि. जळगाव यांनी संगनमत करून फिर्यादीस माहेरहुन आईवडीलांकडुन बुलट मो.सा. घेण्यासाठी व फिरण्यासाठी २ लाख रूपये घेवुन येण्याचे कारणावरून व सदर पैसे मिळाल्यानंतर आम्हाला मुलगा हवा होता पण मुलगीच झाल्याचे कारणावरून व वेल्डींग चे दुकान टाकण्यासाठी माहेरहुन ५ लाख रूपये घेवुन येण्याचे कारणावरून फिर्यादीस शिविगाळ करून मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देवुन शारीरीक व मानसिक छळ केला तसेच आज दिनांक १९.०१.२०१७ रोजी १५.३०वा ते १५.४५वा. दरम्यान फिर्यादी हि माहेरी राहत असताना फिर्यादीचे माहेरी फर्दापुर येथे येवुन ५ लाख रूपये दिले तर वागविल असे म्हणुन फिर्यादी व तीचे नातेवाईकांनी नकार दिल्याने शिविगाळ व मारहाण करून आ.क्रं. ०१ याने फिर्यादीचे अंगावर रॉकेल टाकुन आगकाडी ओढुन फिर्यादीस जाळुन जीवे मारण्याचा प्रयत्न केला व आ.क्रं. ०२ ते ०५ यांनी शिविगाळ केली म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास श्री. मेहत्रे सपोनि पोस्टे फर्दापुर हे करीत आहे.

**दारू बंदी कार्यवाही :—**

औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात विविध पोस्टे ला ०८ गुन्हे मुंबई दारूबंदी कायदया प्रमाणे ०८ ईसमा विरूध्द दाखल झाले असुन त्यांचे कडुन ४८३०/—रू. किं. १८० मिलीच्या ८३ देशीदारू भिंगरी संत्राच्या बाटल्या तसेच २०० ली. गावठी हातभट्टीची दारू बनविण्याचे गुळ नवसागर मिश्रीत रसायन किं. २१,२००/—रू. चा माल मुद्येमाल असा जप्त करण्यात आला आहे.

**मुंबई जुगार कायदाः—** औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात पोस्टे अजिंठा येथे ०२ गुन्हे मुंबई जुगार कायदया प्रमाणे ०६ ईसमा विरूध्द दाखल झाला असुन त्यांचे ताब्यातुन किं. ७३००/—रू. नगदी व जुगाराचे साहीत्य असा मुद्येमाल असा जप्त करण्यात आला आहे

स्वाक्षरीत
पोलीस अधिक्षक
औरंगाबाद ग्रामीण करीता

श्री पोह/३७६ काकडे नियंत्रण कक्ष अधिकारी औरंगाबाद ग्रामीण